# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ३०/०५/२०२४ (गुरूवार) दुपार


---

## अवैध मुरूम गौणखनिजची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
## पोलीस स्टेशन केळवद ची कारवाई

दिनांक २९/०५/२०२४ रोजी पोलीस स्टेशन केळवद येथील स्टाफ यांना गोपनीय माहीती मिळाली की, मौजा हत्तीसर्रा वरून ते केळवद कडे येणाऱ्या रोडने केळवद गावाकडे दोन ट्रॅक्टरमध्ये चोरीचा मुरूम गौण खनिजाची अवैधरीत्या वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून पोलीस स्टेशन केळवद येथील स्टाफ यांनी हत्तीसर्रा गावाचे रोडवर नाकाबंदी केली असता ०२ ट्रॅक्टर ट्रॉलीसह येतांना दिसले. ट्रॅक्टर ट्रॉली चालकांना थांबवून तपासले असता लाल रंगाचा विना नंबरचा ट्रॅक्टर मून्डा व त्याला लागुन असलेली विना नंबरची लाल रंगाची ट्रॉली चा चालक **आरोपी नामे— १) प्रफूल भोजराज ढोबळे, वय २८ वर्ष, रा. वार्ड क्र. ०५ केळवद** व लाल रंगाचा विना नंबरचा ट्रॅक्टर मॅून्डा व त्याला लागुन असलेली विना नंबरची लाल रंगाची ट्रॉली चा चालक **आरोपी नामे— २) आकाश सूधाकर तिरगूडे, वय २६ वर्ष रा. सावंगा ता. सौसर जि. पांढुर्णा** हे आपापल्या वाहनात मुरूम गौणखनिजची चोरटी वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपींना मूरूम गौणखनिज परवाना बाबत विचारले असता मूरूम गौणखनिज बाबत (रॉयल्टी) नसल्याचे सांगीतले. आरोपींच्या ताब्यातून १) ट्रॅक्टर महीन्द्रा ५७५ डी आय सरपंच या कंपनीचा विना नंबरचा किंमती ३,५०,०००/—रू. व लाल रंगाची ट्रॉली नंबर नसलेली कि. १,५०,०००/— रू. व ०१ ब्रास गौणखनिज मूरूम कि. १,०००/—रु चा माल २) ट्रॅक्टर महीन्द्रा ५७५ डी आय सरपंच कंपनीचा बिना नंबरचा किंमती ३,५०,०००/—रू. व लाल रंगाची ट्राली नंबर नसलेली कि. १,५०,०००/— रू व ०१ ब्रास मूरूम गौणखनिज कि. १,०००/—रु असा एकुण दोन्ही वाहनातील १०,०२,०००/—रू. चा मुद्देमाल आरोपींकडून जप्त केला.

सदर प्रकरणी सरतर्फे श्रीधर कूलकर्णी पोलीस स्टेशन केळवद यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, १०९, ३४ भा.द.वी. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा काकडे हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. श्री. अनिल म्हस्के, सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन केळवद येथील ठाणेदार सपोनि. राकेश साखरकर, सफौ किशोर ठाकरे, नापोशि दिपक इंगळे, पोलीस अंमलदार सैफुल्ला अहमद मपोहवा किरण भगत यांनी केली.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर